## खराब व फाटक्या नोटांच्या अदलाबदलीसाठी सुविधा
## नोव्हेंबर २८, २००२

सर्व नागरिकांना कळविण्यात येते की भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) सरकारी क्षेत्रातील सर्व बँकांच्या शाखांना व खाजगी क्षेत्रातील करन्सी चेस्ट शाखांना सर्व प्रकारच्या व सर्व मूल्यांच्या खराब / फाटलेल्या नोटा स्वीकारुन त्या बदलून देण्याचे अधिकार दिले आहेत. मात्र, अशा बदली केलेल्या नोटांचे परतावा मूल्य आर बी आय (नोट रिफंड) नियम, १९७५ नुसार दिली जाईल.

जनतेला अधिक चांगली सेवा देण्यासाठी आरबीआयने फाटक्या नोटांच्या अदलाबदलीची सुविधा टीएलआर (ट्रिपल लॉक रिसेप्टॅकल) कव्हर्स द्वारे ही देऊ केली आहे. जनतेला, आरबीआयच्या सर्व प्रादेशिक कार्यालयांमधील चौकशी खिडकीवर अशी टीएलआर कव्हर्स मिळू शकतील, त्यावर माहिती लिहून व नोटा भरुन संबंधित आरबीआय कार्यालया मध्ये भरल्यावर एक कागदी टोकन दिले जाईल. ही पेटी आरबीआयच्या प्रत्येक इश्यू ऑफिसच्या चौकशी खिडकीवर ठेवलेली आहे. फाटक्या नोटांचे नियमानुसार देय मूल्य, बँक ड्राफ्ट किंवा पे ऑर्डरद्वारे दिले जाईल. रजिस्टर्ड / इन्शुअर्ड पोस्टानेही फाटक्या नोटा कोणत्याही आरबीआय कर्यालयाकडे पाठविता येतील.

अत्यंत खराब झालेल्या, किंवा जळलेल्या नोटा ज्या सामान्य हातावणीत टिकू शकणार नाहीत, त्या फक्त आरबीआयच्या इश्यू ऑफिसमध्येच स्वीकारल्या जातील. अशा नोटा असलेल्या व्यक्तींना, यासाठी रिझर्व्ह बँकेच्या इश्यू डिपार्टमेंटच्या क्लेम्स सेक्शनच्या मुख्य अधिकाऱ्याशी संपर्क साधता येईल.

**अजित प्रसाद**
**व्यवस्थापक**

**प्रेस रिलीज : २००२-२००३/५६१**